REGISTERED No. B. 3434

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १३ मार्च १९४६ अंक ११

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर (जि. नाशिक)

एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. (अध्यक्ष) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. (उपाध्यक्ष) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. (Ele. & Mech.) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. (Hons.) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन्. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

(गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.)

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## खादी मन्दिर

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# विविध माहिती

### जर्मन लोकसंख्येची फ्रान्सला भीति


येत्या ऑगस्टमध्यें पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, व ऑस्ट्रिया यांतील जर्मनांची जर्मनींत रवानगी झाली म्हणजे त्या देशाची लोकसंख्या ६½ कोटि भरेल. युद्धापूर्वीच्या जर्मनींत ह्यापेक्षां १० लाखच लोक कमी होते. फ्रान्सच्या लोकसंख्येपेक्षां ही लोकसंख्या २½ कोटींनीं जास्त आहे. सबंध जर्मनी एका सत्तेखालीं येण्यास फ्रान्सचा विरोध आहे, तो ह्यासाठींच होय.

### हँबर्गमधील आगींचे बळी

बॉंबहल्ल्यांनें हँबर्ग ह्या जर्मन बंदराचें जेवढें नुकसान केलें तेवढें दुसऱ्या कोणत्याही युरोपियन शहराचें केलें नाहीं. १९४३ मधील सहा आठवड्यांच्या आगीनंतर ४६,००० मृतांची मोजणी होऊं शकली. १०,००० ते १२,००० मातीच्या ढिगाखाली कायम राहिले. प्रत्यक्ष बॉंबवर्षावापेक्षा त्यामुळें पेटलेल्या आगींनीं ज्यास्त बळी घेतले. अशा आगींत निदान ५ लक्ष जर्मन मेले व ७ लक्ष जर्मन जखमी झाले. आगीमुळें १४७२° फॅरनहीटपर्यंत उष्णतामान चढलें आणि त्या हवेच्या श्वासोच्छ्वासानें लोक तडफडून मेले.

### सेल्स टॅक्सच्या अंमलबजावणीची पूर्वतयारी

मालाच्या विक्रीवरील कराच्या बिलास गव्हर्नर जनरलची संमति मिळाली आहे, आणि शुक्रवार ता. ८ च्या गॅझेटांत कायदा प्रसिद्ध झाला आहे. कायद्याच्या अंमलबजावणीची पूर्वतयारी तरी करण्यांत येईल. नवें मंत्रिमंडळ ठरवील त्याप्रमाणें पुढची व्यवस्था होईल. परंतु वेळ जाऊं नये, ह्यासाठीं १ जुलैपासून कर वसूल करतां यावा, अशी व्यवस्था करून ठेवण्यांत येणार आहे.




महाराष्ट्र एजन्सी.
मेसर्स जयप्रकाश आणि कं.
२५५।४, सदाशिव, पुणें.

### शत्रूच्या ९९६ पाणबुड्या बुडवल्या

गेल्या महायुद्धांत शत्रुपक्षाच्या एकूण ९९६ पाणबुड्या नष्ट करण्यांत आल्या. त्यांपैकीं ७८१ जर्मन, ८५ इटालियन व १३० जपानी होत्या.

### दुष्काळग्रस्त लोकांना सहाय्य

पुणें जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त पूर्व भागांतील लोकांना कोणत्या प्रकारें सहाय्य करावें,त्याबद्दल विचारविनिमय करून योजना आखण्यासाठीं पुणें शहर व जिल्हा ह्यांतील प्रमुख नागरिकांची सभा पुणें येथें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत शुक्रवार, ता. १५ रोजीं ५ वाजतां, बोलावण्यांत आली आहे. त्याकामीं प्रा. गाडगीळ, रावसाहेब खोले, श्री. आ. गो. गावडे व श्री. द. दि. चितळे ह्यांनीं पुढाकार घेतला आहे.

### श्री. काटदरे ह्यांची निवडणूक

मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वेच्या लोकल ॲडव्हायसरी कमिटीवर महाराष्ट्र चेंबरनें श्री. डी. एस. काटदरे ह्यांची निवड केली आहे. श्री. काटदरे हे दोन वर्षेपर्यंत कमिटीचे सभासद रहातील.

### साखरेच्या धंद्यास संरक्षण

हिंदी साखरेच्या धंद्यास दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९४७ अखेर संपते. ती एका वर्षानें वाढवून, त्यानंतर संरक्षण चालू ठेवावें कीं नाहीं ह्यासंबंधीं शिफारस करण्यासाठीं टारिफ बोर्ड नेमण्यांत येईल, असें समजतें.

### नवीन साखर कारखाने

हिंदुस्थान सरकारनें १७ नव्या साखर कारखान्यांस परवानगी दिली आहे. त्रावणकोर, हैद्राबाद, बडोदें, सरहद्द प्रांत, आसाम आणि बिहार यांत प्रत्येकी एक बंगाल, आणि मद्रासमध्यें दोन, मुंबईमध्यें चार, पंजाबमध्यें तीन, अशी त्यांची वाटणी आहे.

### ३०,००० विहिरी

मद्रास प्रांतांतील दुष्काळी विभागांत ३०,००० विहिरी खणण्यांत येत आहेत. प्रांतिक सरकार त्यासाठीं सहाय्य करीत आहे.

### हैद्राबाद संस्थानासाठीं ट्रॅक्टर्स

निजाम सरकारनें ६० ट्रॅक्टर्स मागितले असून त्यांपैकीं १९४६ सालीं १५ ट्रॅक्टर्स मिळणार आहेत. प्रत्येकाची किंमत सरासरीनें ३०,००० रुपये आहेत.

### हिंदी संस्थानांतील कापडाच्या गिरण्या

एकूण हिंदी कपाशीच्या उत्पादनाच्या एक तृतीयांश उत्पादन संस्थानी हद्दींत होतें. त्यांतील कापडाचें उत्पादन मात्र एक अष्टमांश इतकेंच आहे. इंदूर आणि बडोदें ह्या संस्थानांत सर्वांत ज्यास्त गिरण्या आहेत. हैद्राबाद, भोपाळ, म्हैसूर, रामपूर, जयपूर, बिकानेर इत्यादि संस्थानांतहि गिरण्या पुष्कळ निघाल्या आहेत.

### यु. क. बँकेचा उपक्रम

युनायटेड कमर्शिअल बँकेनें सेव्हिंग्ज सर्टिफिकेटें व ठेवींच्या पावत्या काढल्या आहेत. त्या केवळ सहीनें त्यांचा मालक दुसऱ्याच्या नांवें करून देऊं शकतो. मुदतीप्रमाणें १ ते १¾% व्याज त्यांवर देण्यांत येतें.





पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा

सांडू प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर लिमिटेड. (चेंबूर)

पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

दैनंदिन झीज व आजारानंतरची अशक्तता दूर करणारें टॉनिक




—महाराष्ट्र सोल एजंट—
मे. जयप्रकाश ॲण्ड को
२५५।४ सदाशिव, पुणें

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालक:-एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

# मध्यवर्ती विधिमंडळांत अंदाजपत्रकावरील चर्चा

मध्यवर्ती विधिमंडळांतील अंदाजपत्रकाच्या सर्वसाधारण चर्चेला ता. ४ मार्च रोजीं प्रारंभ होऊन विरोधी पक्षांतील सभासदांचीं भाषणें झालीं. या सर्व भाषणांतून जादा नफ्यावरील कर रद्द करण्याबद्दल, त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या लष्करांतील ब्रिटिश सैन्याच्या खर्चाबद्दल प्रामुख्यानें टीका करण्यांत आली. याशिवाय युद्ध संपलें असतांनाही माहिती खातें व इतर मुलकी खातीं यांमधील अनावश्यक नोकरांना कमी करण्यांत आलेलें नाहीं अशी टीका करण्यांत आली. विधिमंडळांतील कॉंग्रेस पक्षाचे उपनेते श्री. असफअली यांनीं कर-चौकशी-समिति नेमण्याच्या सूचनेचें स्वागत केलें. परंतु या समितीला सल्लामसलत देण्यासाठीं तज्ज्ञ अर्थ-शास्त्रज्ञांचें एक मंडळ नेमण्यांत यावें अशी उपयुक्त सूचना त्यांनीं केली. देशांतील चलनवृद्धीसंबंधीं हिंदुस्थानांतील २४ प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं जें पत्रक काढलें होतें त्यावरून अशा तऱ्हेच्या तज्ज्ञ सल्लागार मंडळाची आवश्यकता असल्याचें उघड दिसून येतें. दुसऱ्याही एका दृष्टीनें अशा मंडळाची आवश्यकता आहे. विधिमंडळांतील राजकीय पक्षापेक्षां पुष्कळदां पक्षाभिनिवेषाच्या आहारीं जाऊन अव्यवहार्य सूचना करण्याचा संभव असतो. अशा सूचना टीकांचें-अर्थशास्त्रीय दृष्ट्या परीक्षण करून आर्थिक अभिवृद्धीच्या दृष्टीनें राज्यव्यवहाराला वळण देण्याचा प्रयत्न अशा मंडळाला करतां येईल. मध्यवर्ती सरकारने अशा तऱ्हेचें मंडळ निर्माण केल्यास ते उपयुक्त ठरल्याशिवाय राहणार नाहीं.

जादा नफ्यावरील कर १ एप्रिल १९४६ पासून रद्द करण्याबद्दल अर्थमंत्र्यावर बरीच टीका करण्यांत आली. सरदार मंगळसिंग, श्री. बी. बी. करमरकर वगैरेंनीं, या अंदाजपत्रकाचा फायदा फक्त बडे भांडवलदार व कंपन्या यांना होणार आहे अशी टीका केली. या बाबतींत बोलतांना ले. कर्नल चतर्जी यांनीं असें सुचविलें कीं जादा नफ्यावरील सर सरसकट एकदम रद्द न करतां हळुहळू उतरत्या भांजणींत कमी करणें योग्य झालें असतें. आपल्या विधानाच्या समर्थनार्थ त्यांनीं इंग्लंडमधील जादा नफ्यावरील कराकडे बोट दाखवून असें सांगितलें कीं त्या देशांत हा कर फक्त ५० टक्क्यांनीं कमी करण्यांत आलेला आहे. अर्थमंत्री सर आर्चिबाल्ड रोलंडस यांनीं जादा नफ्यावरील कर रद्द करण्याच्या समर्थनार्थ पुढील कारणें दिलीं. (१) कर रद्द करण्यामुळें पुढच्या वर्षीच्या उत्पन्नांत फारसा फरक पडलेला नाहीं. (२) हा कर चालू ठेवला असता तर हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाला अडथळा झाला असता आणि त्यामुळें राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याचें खुंटून लोकांची खरेदी करण्याची शक्तिहि कमी झाली असती. अर्थमंत्र्यांनीं केलेलें हें समर्थन लंगडें वाटल्याशिवाय रहात नाहीं. युद्धकालीन हिंदुस्थानांत उद्योगधंद्यांची वाढ एरवींपेक्षा झपाट्यानें झाली. परंतु त्यामुळें देशांतील बहुसंख्य जनतेची खरेदी-शक्ति वाढलेली नाहीं. युद्धकालीन सरकारी मागण्यांमुळें या कारखान्यांची भरभराट झाली खरी, परंतु उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल शेतकीच्या धंद्याकडून यावयाचा, त्याची वाढ अगदींच किरकोळ झाली. म्हणजे औद्योगिक प्रगति व शेती यांच्यांत जो समतोलपणा राखला जाणें अवश्य आहे तो राखला गेलेला नाहीं, त्यामुळें आधींच कंगाल झालेली हिंदुस्थानांतील खेड्यांतील जनता कारखान्यांतून बाहेर पडणारा पक्का माल मोठ्या प्रमाणावर घेऊं शकणार नाहीं. युद्धोत्तर सालीं मोठ्या प्रमाणावर किफायतशीर शेतीची वाढ झाल्याशिवाय कारखान्यांच्या मालाचा उठाव निदान हिंदुस्थानच्या बाजारपेठांत तरी चांगलासा होणार नाहीं. पण हिंदुस्थानची युद्धोत्तर अर्थव्यवस्था सरकारच्या आर्थिक नियोजन खात्याकडे असल्याने या बाबतींत अर्थमंत्र्यांनी विचार केलेला दिसत नाहीं. लोकपक्षाच्या प्रतिनिधींना जबाबदार नसणाऱ्या हिंदुस्थानांतील सध्यांच्या सरकारच्या निरनिराळ्या खात्यांत एकसूत्रीपणा नसावा यांत आश्चर्य नाहीं. याच कारणाकरितां अर्थशास्त्रज्ञ श्री. सी. एन्. वकील यांनीं आपल्या जागेचा नुकताच राजीनामा दिला. सध्यांच्या सरकारच्या जागीं कोणत्या तरी स्वरूपाचें राष्ट्रीय सरकार आल्यावर अशा अनागोंदी कारभारास इष्ट असें वळण लागण्याची शक्यता निर्माण होईल. हिंदी उद्योगधंद्याच्या भवितव्याबद्दल अर्थमंत्र्यांनीं दाखविलेली आस्था व्यवहारांत मात्र दिखाऊ स्वरूपाची आहे. हिंदुस्थानांतील सर्वच कारखान्यांची—उदा. कापडाच्या गिरण्या-यंत्रसामुग्री जुनी झालेली असून त्याऐवजीं नवी यंत्रसामुग्री बसविणें फार जरूरीचें झालेलें आहे. पण इंग्लंड व त्याच्या पौंडाच्या कक्षेंत असणारीं राष्ट्रें यांमधून जरूर ती यंत्रसामुग्री आज मिळूं शकत नाहीं आणि त्याबाहेरील उद्योगप्रधान देशांतून, उदाहरणार्थ अमेरिकेंतून यंत्रसामुग्री आणावी तर पौंडाबद्दल पुरेसे डॉलर्स मिळण्याची व्यवस्था नाहीं. व्यापारमंत्री सर अझीझ-उल्-हक यांनीं सांगितलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं १ लाख डॉलर्सपर्यंत अमेरिकेंतून माल आणण्यास आयात परवान्याची जरूरी लागत नाहीं. त्याच्यापुढें मात्र अशा परवान्याची जरूर लागत असावी. त्यांतहि मौज अशी कीं पौंडाच्या कक्षेंतील देशांत जरूर ती यंत्रसामुग्री मिळूं शकत नाहीं हें पुनः हिंदी कारखानदारांनींच दाखवून द्यावयाचें आहे.

ब्रिटिश लष्कर आणि हिंदी लष्कर यांवर होणाऱ्या खर्चाबाबत युद्ध-चिटणीस मि. मेसन यांनीं कांहीं माहिती सांगितली. मि. असफ अली यांनीं ब्रिटिश लष्करी शिपायांचा खर्च हिंदी शिपायांच्या चौपट असतो असें विधान केलें होतें. त्याला उद्देशून मि. मेसन म्हणाले कीं हा जादा खर्च फक्त अडीच पट आहे. हिंदुस्थानच्या संरक्षण खात्याचा खर्च युद्धपूर्वकाळाइतका कमी होण्याचें लक्षण दिसत नाहीं असें सांगून याचें कारण म्हणून आधुनिक युद्धकला अधिक गुंतागुंतीची व म्हणून अधिक खर्चाची झाली असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें. श्री. बाळकृष्ण शर्मा यांनीं ९ ब्रिटिश विमानांचे ताफे (squadrons) ठेवण्यास १० हिंदी विमानांच्या ताफ्यांच्या तिप्पट खर्च येतो असें दाखवून परकीय लष्करामुळें हिंदुस्थानच्या तिजोरीवर निष्कारण भार पडतो असें सांगितलें. अंदाजपत्रकावरील चर्चेचा आशय लक्षांत घेऊन सर रोलंडस् यांनीं पोस्टाच्या कार्डाचे दर, काड्याच्या पेट्या, विड्या व सुपाऱ्या यांवरील अप्रत्यक्ष कर कांहीं प्रमाणांत कमी करतां येतील कीं काय यासंबंधीं फिनॅन्स बिलावरील चर्चेपूर्वी विचार करण्याचें आश्वासन दिलें आहे.

### रशियन व्याप्त जर्मनींतील बँका

रशियन व्याप्त जर्मनींतील सर्व महत्त्वाच्या बँका सशस्त्र रशियन सैनिकांनी आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत. बँकांच्या प्रमुख अधिकाऱ्यांस अटक करून बाकीच्या नोकरांस हाकून देण्यांत आलें आहे.

### बँक ऑफ औंध लि.

(वार्षिक सभा : ३१-३-४६)

वरील बँकेच्या भाग भांडवलांत ३१ डिसेंबर, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी ३,९८० रुपयांची वाढ होऊन तें १,४२,००० रुपये झालें. रिझर्व्ह फंड ३९,२६२ रुपये झाला आहे. ठेवी वाढ-ल्यामुळें खेळत्या भांडवलांत सुमारें ५ लक्ष रुपयांची भर पडून तें १५३/४ लक्ष रुपये झालें आहे. ठेवींतील सर्व वाढ सेव्हिंग्ज व चालू खात्यांतच आहे, हें विशेष असून "बँकेच्या इतिहासांत ही परिस्थिति अपूर्व अशी आहे व जनतेचें बँकेवरील विश्वासाचें प्रतीक आहे." मागील वर्षी आम्हीं लिहिल्याप्रमाणें, मुदती ठेवींवरील व्याजाचा दर ज्यास्त असतो, ह्या दृष्टीनें ठेवींच्या खात्यांतील हा फरक बँकांचा धंदा अधिक किफायतशीर होण्यास सहाय्यकारक आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,४३५ रुपये नफा झाला. नफ्या-पैकी २,०६० रुपये रिझर्व्ह फंडांत जाणार असून द. सा. द. शें. ४% डिव्हिडंड देण्यास ५,५८८ रुपये लागतील. अहवालाचे साल अखेर जुन्या स्टेट बँकेच्या कर्जाबाबत जबाबदारी पुरी केली असून याबाबत संस्थानबरोबर जो करार झाला होता त्यांतून बँक मुक्त झाली आहे. अहवालाचे वर्षी श्री. श्री. प्र. ओगले ह्यांचे जागीं श्री. न. ग. कुंडलकर व श्री. शं. ल. किर्लोस्कर ह्यांचे जागीं श्री. मा. रा. जोशी ह्यांना बोर्डावर को-ऑप्ट करून घेण्यांत आलें. औंधचे पंतप्रधान श्री. नामदार विद्री हें बँकेच्या संचालक मंड-ळाचे अध्यक्ष असून श्री. बा. रा. वर्तक हे अधिकारपरत्वें मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### आयुर्विम्याच्या अर्थशास्त्राला ॲटम बॉंबचा धक्का

होरोशिमा व नागासकी या जपानी शहरांना उध्वस्त करणाऱ्या ॲटम बॉंबनें आयुर्विम्याच्या अर्थशास्त्रालाही जबरदस्त धक्का दिलेला आहे. आधुनिक युद्धांत वापरण्यांत येणारीं संहारक शस्त्रें भयंकर असलीं तरी त्यांच्यामुळें समाजाच्या मामुली अर्थशास्त्रांत विलक्षण फरक तडकाफडकी झालेला दिसून येत नाहीं. पुढें मागें पांच दहा वर्षांत ॲटमची शक्ति औद्योगिक कारखान्यांतून वापरतां येऊं लागल्यावर कदाचित् तसा फरक पडेल. पण तत्पूर्वी ॲटम बॉंबच्या संहारक शक्तीनें आयुर्विमा व्यवसायाला मात्र सावध केलें आहे. कॅनडांतील सुप्रसिद्ध आयुर्विमा कंपनी सन लाइफतर्फे असें जाहीर करण्यांत आलें आहे कीं कंपनीच्या यापुढील विमेदारांना ॲटम बॉंबनें मृत्यू आल्यास त्यांच्या हक्कांची पूर्ति कंपनीकडून केली जाणार नाहीं. यापूर्वी युद्धामुळें उत्पन्न झालेल्या जादा जोखमीची जबाबदारी या कंपनीच्या विमापत्रकांत अंतर्भूत केलेली असे.

यासंबंधीं बोलतांना कंपनीचा एक अधिकारी म्हणाला कीं लंडन शहरावर जर एकच ॲटम बॉंब पडला तर कंपनीला जवळ जवळ ७ लाख ५० हजार पौंड विमेदारांच्या हक्कपूर्तीसाठी द्यावे लागतील असा अंदाज आहे. तथापि या प्रकारानें मृत्यू आल्यास भरलेले हप्ते सामान्यतः परत करण्यांत येतील. एकंदर विमेदारांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें ॲटम बॉंबपासून उद्भवणाऱ्या मृत्यूबाबत कंपनीनें स्वीकारलेलें धोरण योग्यच आहे. कारण असें धोरण स्वीकारलें तरच विमा-करारांची अंमलबजावणी करण्याची शक्यता शिल्लक राहण्यासारखी आहे. अर्थात चालू असलेल्या जुन्या विमेदारांच्या बाबतींत ॲटम बॉंबच्या धोक्याची जोखीम कंपनीवर रहातेच. परंतु यापुढें दिल्या जाणाऱ्या विमा-पत्रकांत मात्र ॲटम बॉंबपासून मृत्यु आल्यास विम्याची रक्कम दिली जाणार नाहीं, अशा आशयाची अट घालणें जरूर आहे. विमा-शास्त्र सामान्यपणें होणाऱ्या मृत्यूंच्या संभवावर आधारलेलें असल्यामुळें, ॲटम बॉंबसारख्या भयानक आपद्-धर्माच्या बाबतींत अपवाद करणें योग्यच ठरणार आहे.

### कॅनडाचें इंग्लंडला कर्ज

कॅनडा ग्रेट ब्रिटनला १ अब्ज, ७४३/४ कोटि रुपयांचें कर्ज देणार आहे. युद्धामुळें इंग्लंडला बाहेरील देशांत मिळणारें उत्पन्न बंद झालें आहे तें पूर्ववत् मिळूं लागेपर्यंत इंग्लंडची होणारी कुचंबणा दूर करणें, हा त्या कर्जाचा उद्देश आहे. ५० वर्षांचे अवधींत कर्जाची फेड व्हावी १ जानेवारी, १९५१ नंतर त्यावर २% व्याज आकारण्यांत यावें, अशी योजना आहे.


**महाराष्ट्र बँकेचे शेअर्स**

**विकत घेणें आहेत.**

भावासंबंधीं चौकशी :—"क्ष" C/o अर्थ, पुणें ४.


## NOTICE TO CONTRACTORS

Separate sealed tenders on D. Forms are invited for C. R. to certain roads (for 1946-47) in the Poona North sub-Division. Information regarding names of roads, estimated cost, earnest money required to be paid etc., can be seen in the office of the Executive Engineer.

2 Tender forms will be issued on payment of Rs. 3/-per copy of each tender up to the 20th March 1946 and tenders received upto 3 p. m. on the 22nd March 1946.

S. K. Karandikar,
Executive Engineer,
Poona Division.

Office of the Ex. Engineer,
Poona Division.
Poona, 4th March. 1946.

## नोटीस

### दी बँक ऑफ औंध लिमिटेड, औंध

नोटीस देण्यांत येते कीं,

बँकेच्या भागीदारांची आठवी सर्वसाधारण सभा रविवार तारीख ३१ मार्च १९४६ रोजीं दुपारीं ४ वाजतां (स्टँ. टा.) औंध येथें श्रीयमाई देवीच्या मंडपांत खालील कामाकरितां भरणार आहे.

१ ३१ डिसेंबर १९४५ अखेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टर यांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

२ डिव्हिडंड जाहीर करणें.

३ व्यक्तिशः भागीदारांतर्फे दोन डायरेक्टर्स व सहकारी सोसायट्यांतर्फे एक डायरेक्टर यांची निवडणूक करणें.

४ नवीन सालाकरितां ऑडिटर यांची निवडणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

औंध,
ता. ५ फेब्रुवारी
१९४६.

बोर्डाच्या हुकुमावरून
बा. रा. वर्तक,
मॅनेजिंग डायरेक्टर.

वि. सू.—बँकेचीं ट्रॅन्सफर बुकें ता. ३१-३-४६ ते १४-४-४६ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तें सोमवार ता. १५ एप्रिल १९४६ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोस्टानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## रेल-रोड योजनांचें भवितव्य

( लेखक—रामचंद्र वामन कुळकर्णी, बी. ए., पुणें )

मध्यवर्ती कायदेमंडळानें रेल-रोड योजनेबाबत चौकशी करण्यासाठी सात सभासदांची अॅड-हॉक कमिटी नेमली होती. त्या कमिटीचा रिपोर्ट १८ फेब्रुवारी रोजीं सभागृहापुढें सादर करण्यांत आला. कमिटीचा रिपोर्ट एकमतानें झालेला नाहीं. तो बहुमताचा रिपोर्ट आहे. रिपोर्टांतील शिफारसी येणेंप्रमाणें :—

### अॅड-हॉक कमिटीच्या शिफारसी

( १ ) पूर्वी झालेल्या करारानुसार सरकारनें मोटारवाल्यांशीं विचारविनिमय करावयास हवा होता तो केला नाहीं. ( २ ) लवकरच प्रांतोप्रांतीं सरकारांत बदल होणार असल्यामुळें रेल्वे-खात्यानें आपला पैसा तूर्त या कामीं गुंतवूं नये; व रेल-रोड स्कीममध्यें आर्थिक भाग घेणें लांबणीवर टाकावें. ( ३ ) वटहुकूम नं. ३१ सन १९४५ यांत दुरुस्ती करण्यांत यावी. सदर वटहुकुमांत परमिटसंबंधीं सरकारनें घेतलेले जादा अधिकार परत घ्यावेत. अन्नवाहातुकीच्या खास कामाकरितां मात्र वट-हुकुमांतील अधिकार वापरण्यास हरकत नाहीं. ( ४ ) वरील वटहुकुमाप्रमाणें जीं परमिटें रद्द झालीं तीं पुन: देण्यांत यावींत. ( ५ ) सरकारनें मध्यप्रांतांतील कंपनीच्या मॅनेजिंग एजंटाबरोबर केलेले करार नियमबाह्य आहेत.

### रेल-रोड योजना तूर्त स्थगित ?

वरील शिफारसीनुसार असेंब्लीनें ६६ विरुद्ध २६ मतांनीं, रेल्वेला रस्तावहातुकींत आर्थिक भाग घेतां यावा म्हणून रेल्वे बजेटमध्यें जी अदमासें ३½ कोटि रुपयांची मागणी करण्यांत आली होती, ती फेटाळून लावली. त्यामुळें तूर्त एक वर्षभर तरी रेल्वे या बाबतींत लक्ष घालणार नाहीं, व अर्थात् रेल्वेला वगळून सध्यांचें ९३ कलमी प्रांतिक सरकारें नवीन लोकतंत्र सरकार अधिकारारूढ होण्यास फक्त कांहीं दिवसांचाच अवधि आहे हें लक्षांत घेऊन या रेल-रोड योजना तूर्त स्थगितच करतील अशी खात्री वाटते.

### लोकतंत्र सरकारचें धोरण

नवीन लोकतंत्र सरकार मोटार वहातुकीच्या प्रश्नाबाबत खालीलपैकीं कोणतीहि एक गोष्ट निश्चित करणार आहे.

( १ ) मोटार वहातुकीच्या धंद्याची संपूर्ण मालकी प्रांताकडे घेणें.

( २ ) मोटार वहातुकींत आर्थिक भाग घेऊन ठेऊन मोटार मालकांतर्फे धंदा करणें.

( ३ ) मोटार वाहनांच्या कायद्यांत आणखी सुधारणा करून जादा नियंत्रणाखाली हा धंदा आहे या लोकांच्याच हातांत ठेवणें व ठराविक मुदतींत त्यांच्यांत सुधारणा घडून आल्याचें दिसून न आल्यास तो धंदा आपल्या ताब्यांत घेणें.

अर्थात वरीलपैकीं नवीन सरकारकडून कोणत्या मार्गाचा अवलंब केला जाईल, हें जरी आज निश्चित सांगतां येत नसलें तरी अॅड-हॉक कमिटीच्या शिफारसींस ज्याअर्थी प्रांतिक मंत्रिमंडळें येईपर्यंत रेल-रोडचा प्रश्न तहकूब ठेवावा असें म्हटलें आहे त्या-अर्थी हा धंदा खाजगी मालकीचा कितपत राहील याबद्दल शंका वाटते.

### फेडरेटेड कंपन्यांची जरूरी

तरीही पण हें जनतेचें येणारें सरकार, खाजगी धंद्यावर एकाएकीं गदा आणणार आहे. त्यांना योग्य तो अवधि देऊन प्रवासू जनतेचीं मतें मागविलीं जातील. त्या दृष्टीनें सध्यां वहा-तुकीचा धंदा करणाऱ्या मोटार कंपन्यांनीं प्रत्येक रस्त्यावर एक फेडरेटेड कंपनी करून त्यामार्फत धंदा करावा व त्यामार्फत लोकांच्या गैरसोयींकडे लक्ष द्यावें. यापुढें जनता कोठल्याही अड-चणींचे पाढे ऐकण्यास तयार नाहीं. स्वस्त व कार्यक्षम वहातुक मिळण्याचा तिला हक्क आहे. त्याचप्रमाणें मोटार धंद्यांतील हाता-खालच्या ड्रायव्हर्स, कंडक्टर्स व इतर नोकर वर्गाची परिस्थिति सुधारण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. त्यांना अर्धपोटीं व जास्त वेळ कामास लावणें तोट्याचें आहे, कारण त्यांचेशींच नेहमीं प्रवासू जनतेचा जास्त संबंध येत असतो.

पुढील सरकार या बाबतींत काय धोरण स्वीकारणार हें सर्वस्वीं मोटारवाल्यांवरच अवलंबून आहे. योजना तूर्त स्थगित झाल्या म्हणून दोन महिने कोणाच्या सांगण्यावरून ते स्वस्थ राहिले तर त्यांच्या नाशास तेच कारणीभूत होतील. मग त्यांचा वाली कोणी नाहीं.

---

### इन्कम् टॅक्स किती पडेल ?

खालील तक्त्यांत नव्या दराप्रमाणें इन्कम् टॅक्स किती द्यावा लागेल, ह्याचे ५० हजार रुपयांच्या प्राप्तीपर्यंतचे आकडे दिले आहेत. 'मिळविलेल्या' उत्पन्नांत देण्यांत आलेली सूट त्यांत हिशेबामध्यें घेतलेली आहे. लिमिटेड कंपन्यांस हे दर लागू नाहींत.

| प्राप्ति | इनकम टॅक्स | सुपरटॅक्स |
|---|---|---|
| ३,००० | ५६—४ | नाहीं |
| ४,००० | १०६—४ | „ |
| ५,००० | १५६—४ | „ |
| ७,००० | २९३—१२ | „ |
| १०,००० | ५९३—१२ | „ |
| १२,००० | ७९३—१२ | „ |
| १५,००० | १,२८१—४ | „ |
| २०,००० | २,२५०—० | „ |
| २५,००० | ३,८१२—८ | „ |
| ३०,००० | ५,३७५—० | ६२५—० |
| ३५,००० | ६,९३७—८ | १,२५०—० |
| ४०,००० | ८,५००—० | २,१८७—८ |
| ४५,००० | १०,०६२—० | ३,१२५—० |
| ५०,००० | ११,६२५—० | ४,३७५—० |

### भांडवल उभारणीच्या अर्जांचा निकाल

मे, १९४३ ते सप्टेंबर, १९४५ अखेर कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजकडे ४,६६० कंपन्यांनीं ३८५ कोटि रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी मागितली. त्यांपैकी ३,७८४ कंपन्यांना २६० कोटि रुपयांचें भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली. ८७६ कंपन्यांचे ८९ कोटि रुपयांचे अर्ज नामंजूर झाले. कांहीं अर्ज अंशत: मान्य करण्यांत आले. २६० कोटींच्या भांड-वल उभारणीस परवानगी देण्यांत आली, त्यांपैकी १५९ कोटींचें भांडवल उद्योगधंद्यांसाठी होतें. नकार दिलेल्या अर्जांपैकीं ७०% बिगर औद्योगिक भांडवलाबाबत होते.

### सिंधिया कंपनी भांडवल-वाढविणार

सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. नें आणखी २½ कोटी रुप-यांचें भांडवल उभारण्याचें ठरविलें आहे.

## कवजाच्या दाव्यांत पोट भाडेकऱ्याचें स्थान

मुख्य भाडेकऱ्याविरुद्ध चाललेल्या जागेचा ताबा घेण्याच्या मालकाच्या दाव्याचा पोटभाडेकऱ्यावर काय परिणाम होतो ? या महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल मुंबई हायकोर्टाच्या एका दाव्यांत नुकताच लागला.

मुंबईतील जुन्या लोहार गल्लीतील नूर बिल्डिंग नामक इमारत इब्राहिम अहमद आणि कंपनी यांजकडे भाड्यानें होती आणि अहमद अबदुल यांजकडे पोटभाड्यानें होती. मालक बिलिमोरिया यानें इब्राहिम कंपनीकडून भाड्याचा करार संपवून जागा परत मिळविली. पण दुसरा प्र. वादी अहमद अबदुल जागा खाली करून देईना. तेव्हा कोर्टांत दावा करण्यांत आला. इब्राहिम कंपनीनें दावा मान्य केला पण अहमद अबदुल भाडेनियंत्रणाच्या कायद्याचा आधार घेऊन संरक्षण मागूं लागला.

न्यायमूर्ति वेस्टन यांनीं पोटभाडेकऱ्याविरुद्ध निकाल दिला. पोटभाडेकरी हा मूळ भाडेकऱ्याचा भाडेकरी असतो. तेव्हा मालक जेव्हा भाडेकऱ्यास जागा सोडावयास लावतो तेव्हा त्याच्याबरोबरच पोटभाडेकऱ्याचेहि हक्कसंबंध संपतात. मालकाला न विचारतां जागेंत ठेविलेल्या पोट भाडेकऱ्यास अशा वेळीं जागा खाली करणेंच भाग आहे.

येणेंप्रमाणें निर्णय देऊन कोर्टानें भाडेकरी व पोटभाडेकरी यांचे परस्पर संबंध निश्चित केले आहेत.

भाडेनियंत्रणाच्या कायद्यापासून भाडेकऱ्यास कोणत्याहि प्रकारची मत्ता ( Property ) प्राप्त झालेली नाहीं, तर फक्त एक प्रकारचें वैयक्तिक संरक्षण मिळालेलें आहे, भाडेकऱ्याला या संरक्षणाचा हक्क पोटभाडेकऱ्यास देतां येणार नाहीं, भाडेकऱ्याबरोबरच पोटभाडेकऱ्यासहि जागा खाली करून देणें भाग आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण

१—३—४६

| | |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | रु. |
| अ. सोनें व सोन्याचीं नाणीं:— | |
| हिंदुस्थानांतील सांठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील सांठा | ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,२५,३२,८९,००० |
| अची बेरीज | ११६९,७४,३४,००० |
| ब. रुपयाचीं नाणीं | १२,५५,८४,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,१२,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी ( चलनी नोटांची एकूण रक्कम ) | १२,४०,१४,३०,००० |

या आठवड्यांत चलनी नोटांत सुमारें १४ कोटि रुपयांची भर पडली. नोटांच्या तारणासाठी स्टर्लिंग रोख्यांत सुमारें तेवढीच वाढ झाली.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

खपलेलें भांडवल : २,९७,६७,१०० रु.
वसूल झालेलें भांडवल : १,४८,८३,५५० रु.
रिझर्व्ह फंड : १,८३,३३,५५० रु.

मुख्य कचेरी : ओरिएन्टलें बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
भद्र ( मुख्य ऑफिस )
एलिस ब्रिज
स्टेशन ब्रँच
माणेक चौक
अमृतसर
अंधेरी ( मुंबई शेजारीं )
वांद्रे ( मुंबई शेजारीं )
भुज ( कच्छ )
मुंबई
बुलियन एक्सचेंज
कुलाबा
काळबादेवी
मलबार हिल
कलकत्ता
क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य ऑफिस )
बडा बझार
चौरंगी स्केअर

कोइमतूर
हैद्राबाद ( सिंध )
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
किंग्जवे
इतवारी बझार
पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
वेरावळ

लंडन एजन्ट्स : दि वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. ( चेअरमन ), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के, नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; ना. सर शांतिदास आस्करण, नाइट; श्री. महंमद सुलेमान कासम मिठा.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

वुइल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टींचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट



अत्यंत गुणकारी—

## कामगार ब्राह्मी तेल
व
## माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.

म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २

# स्फुट विचार

### "घटना कायद्यांतले व्यापारी निर्बंध हिंदुस्थानच्या हिताचे आहेत"

हिंदुस्थानच्या १९३५ च्या घटना कायद्यांत ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या हितसंरक्षणासाठीं कांहीं कलमें ग्रथित करण्यांत आलीं आहेत. त्यांचा उद्देश तीं येथील कायदेमंडळ व सरकार ह्यांस बंधनकारक व्हावींत आणि हिंदुस्थानास दिलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग ब्रिटिश धंदेवाल्यांस अपायकारक प्रकारानें होऊं नये असा आहे. हीं कलमें प्रस्तुत कायद्यांतून काढून टाकण्यांत यावीं, असा एक ठराव मध्यवर्ती असेंब्लीनें गेल्या वर्षी एप्रिल महिन्यांत मान्य केला. हिंदुस्थानास राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळावें अशी मागणी केली जात आहे. आणि आंतरराष्ट्रीय परिषदांत ह्या देशाचे प्रतिनिधी बरोबरीनें भाग घेत असतांना, कोणत्याहि राष्ट्राच्या घटनेंत नसलेलीं बंधनें येथें कां असावीं ? असा हिंदी प्रतिनिधींचा सरळ सवाल होता. हीं बंधनें काढून टाकण्यासंबंधीं असेंब्लीनें ठराव केला. त्याच्या अंमलबजावणीबाबत सरकारनें काय केलें, असा प्रश्न श्री. मनु सुभेदार यांनीं असेंब्लींत विचारला. असेंब्लीमधील सर्वंद चर्चा भारतमंत्र्यांकडे धाडण्यांत आली आणि नियोजन मंत्रि हे ह्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी स्वतः लंडनला गेले; त्यामुळें पत्रव्यवहार होण्याचें कारण पडलें नाहीं, अशी माहिती सरकारतर्फे देण्यांत आली. ग्रेटब्रिटनमध्यें मजूर मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर सर अर्देशीर दलाल, तेव्हांचे नियोजन मंत्रि, ह्यांनीं त्या मंत्रिमंडळाशीं बोलणीं केलीं. हिंदुस्थान व इंग्लंड यांचेमध्यें हिंदी राज्यघटनेसंबंधीं व्यापक बोलणीं लवकरच सुरू होणार असल्याकारणानें, विशिष्ट कलमांचा विचार करणें सोईचें होणार नाहीं, असें त्यांस तोंडी उत्तर मिळालें. युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी हिंदी व ब्रिटिश धंदेवाल्यांमध्यें सहकार्याची आवश्यकता आहे. आणि घटना कायद्यांतले निर्बंध काढून घेतल्यास ब्रिटिश धंदेवाले बिथरून जातील, असा युक्तिवाद पुढें करण्यांत आला आणि निर्बंध काढणें हें हिंदुस्थानच्या हिताचें नाहीं असें सर आर्देशीर ह्यांस सांगण्यांत आलें.

### विमा-पत्रकांतील नॉमिनी नेमण्याचा विमेदारांचा हक्क

१९३८ च्या विमा कायद्यांत आणखी दुरुस्ती करणारें एक बिल २८ फेब्रुवारी रोजीं मध्यवर्ती विधिमंडळांत मंजूर झालें. १९३८ च्या विमा कायद्याच्या ३९ व्या कलमाप्रमाणें विमेदारानें विमापत्रकांत आपली पत्नी अगर मुलें यांना नॉमिनी नेमलेलें असेल तर १८७४ च्या विवाहित स्त्रियांच्या मालमत्तेच्या कायद्याच्या ६ व्या कलमाप्रमाणें सदर विमा-पत्रकांतील रकमेचा कायदेशीर ट्रस्ट होतो असें कायदेपंडितांचें मत होतें. त्यामुळें अडचण अशी निर्माण झाली कीं, विमेदाराच्या पश्चात् विम्याचे पैसे विमेदाराच्या नॉमिनीला न देतां ते ज्या इलाख्यांतील विमा कंपनी असेल त्या इलाख्याच्या ऑफिशिअल ट्रस्टीला ते द्यावे लागले असते. ही अडचण नुकत्याच मंजूर झालेल्या बिलाच्या २० वें कलमान्वयें दूर करण्यांत आली आहे. या कलमान्वयें विमेदाराचा नॉमिनी नेमण्याचा हक्क अनिर्बंधपणें मान्य करण्यांत आला असून विमाकायद्यान्वयें अगर विवाहित स्त्रीच्या मालमत्तेच्या कायद्यान्वयें विमेदाराला आपला नॉमिनी नेमतां येईल. अर्थात नॉमिनी नेमतांना कोणत्या कायद्याखालीं नेमावयाचा याचा विचार विमेदाराला आतां आधीं करावा लागेल. विमेदारानें विमा कायद्यान्वयें नॉमिनी नेमल्यास नॉमिनी बदलण्याचा विमेदाराचा हक्क अबाधित राहील. उलट विवाहित स्त्रीच्या मालमत्तेच्या कायद्याप्रमाणें नॉमिनी नेमल्यास नॉमिनी पुन्हा बदलण्याचा अधिकार विमेदाराला न रहातां विम्याच्या रकमेवर कायदेशीर ट्रस्ट आपोआप निर्माण होईल. अशा रीतीनें कोणत्या कायद्याखालीं नॉमिनी नेमावयाचा हा प्रश्न विमेदाराच्या हेतूवर यापुढें अवलंबून रहाणार आहे.

### ब्रिटिश बँकांचा नफा व त्याचा विनियोग

ग्रेट ब्रिटनमधील सात प्रमुख बँकांस झालेल्या नफ्याची छाननी केली असतां ती बोधप्रद होईल. व्याजाचे दर आणखी उतरले असल्याकारणानें युद्धकाळांतील त्यांच्या वाढत्या नफ्यास थोडा आळा बसलेला आढळतो. १९४३ सालीं त्यांना जितका नफा झाला, त्यापेक्षा १९४४ मधील नफा ४·२% जास्त होता आणि १९४४ चे मानानें १९४५ सालीं २·१% नफा अधिक झाला. गेल्या वर्षी बँकांनीं रिझर्व्ह फंडांत मोठी भर घातली, आतां इमारत खातीं जास्त रकमा टाकण्यांत आल्या. पुढील वर्षांत ओढलेली रकमहि आतां वाढली आहे.-खालील तक्ता पहा:—

( हजार पौंडांचे आकडे )

| | १९४५ | १९४४ | १९४३ |
|---|---|---|---|
| नफा | ९,२८५ | ९,०९५ | ८,७२९ |
| रिझर्व्ह फंडाकडे | १,३०० | १,४०० | ६०० |
| इमारत खातीं | १,०१० | ८१० | ७६० |
| कॉंटिन्जन्सी | ८०० | ८५० | १,३०० |
| पुढील वर्षांत ओढला | ४,१९० | ३,८९२ | ३,७४८ |

### अमेरिकेंतील निग्रो लोकांची स्थिति

अमेरिकेंतील निग्रो लोकांची स्थिति सुधारण्याच्या प्रयत्नांची बरीच जाहिरात झाली आहे, परंतु अद्याप तेथील निग्रो लोकांची स्थिति फारच वाईट आहे. अमेरिकन व निग्रो ह्यांत आर्थिक बाबींत भेदाभेद करूं नये, असा न्यूयॉर्क स्टेटनें कायदा केला आहे, परंतु तो पुस्तकांतच राहिलेला दिसतो. वाईट बिऱ्हाडांसाठी त्यांस भलतेंच भाडें द्यावें लागतें. अमेरिकेच्या दक्षिण भागांत "जिम क्रो" हॉटेलें व वहातुकीच्या गाड्या ह्यांच्याखेरीज इतरांचा उपयोग करण्याची त्यास मनाई आहे. निग्रो मुलांनीं "जिम क्रो" शाळांतच गेलें पाहिजे. प्रत्येक श्वेत वर्णीय मुलाच्या शिक्षणावर सरकारनें एक रुपया खर्च केला तर निग्रो मुलांच्या शिक्षणावर दोन आणे खर्च होतो. उत्तर अमेरिकेंत हॉटेलांतून व थिएटरांतून निग्रोंना मज्जाव नाहीं, परंतु कोठल्या तरी सबबीवर त्यांस प्रवेश नाकारण्यांत येतो. एक दोन वर्षांत अमेरिकेंत आर्थिक मंदी निर्माण झाली, म्हणजे डेट्रॉइट, न्यूयॉर्क, शिकागो, क्लिव्हलँड, वाशिंग्टन इत्यादि ठिकाणीं श्वेतवर्णीय व निग्रो ह्यांच्यामध्यें दंगे झाल्याविना राहणार नाहींत, असें एका निरीक्षकाचें मत आहे.

### कंपनीच्या नांवाखालीं बक्षिसाची चढाओढ

तूर्त साबण, तेलें व नंतर इतर टॉयलेटचे जिन्नस तयार करण्यासाठीं एक कंपनी स्थापन होत आहे. ह्या कंपनीस व तिच्या जिनसांस चांगलें नांव पाहिजे आहे. तें नवीन, सोपें, लहान, नादमधुर, आठवण्यास सोपें, सर्व कामीं उपयोगी पडेल असें, लवकर शिळें न होण्याजोगें, हिंदी लोकांस आवडेल असें व अजातीय असावें. ह्या नांवाचा शब्द नवीन निर्माण केलेला असला तरी चालेल. तो इंग्रजी लिपींत सहज लिहितां यावा. अशीं नांवें सुचविणारास कंपनीनें बक्षिसें देऊं केलीं आहेत. पहिल्या तीन नांवांस अनुक्रमें ३०० रु., १५० रु., व ७५ रु. बक्षिस मिळावयाचें आहे.

# " भरीव योजनांचा पाया–दर्शकांक "

(ले० तात्या तेंडुलकर, कोल्हापूर)

१ रानटी युगांत मनुष्यास फक्त पोटापाण्याचीच विवंचना होती. मनुष्याची विचारशक्ति जशी वाढूं लागली, तसें हें युग संपुष्टांत आलें. ऐहिक सुखसाधनांत अधिकाधिक भर पडूं लागली. त्याबरोबर मानवांस आपण कोठें आहोंत, हें जाणण्याची अधिकाधिक जिज्ञासा निर्माण झाली. यासही दोन फाटे फुटले. एक तात्विक, दुसरा आधिभौतिक. आधिभौतिक साधनसामुग्रीची योग्य अशी मोजदाद व्हावी, आर्थिक परिस्थितीचा शक्य तितका अचूक अंदाज घेतां यावा, म्हणून संख्याशास्त्र अस्तित्वांत आलें. वाढत्या मानवी गरजा, प्रज्वलित आकांक्षा, विभिन्न परिस्थितींतील हरएक तऱ्हेचें उत्पादन यांची योग्य अशी मोजदाद व्हावी. ती सर्वसामान्य जनांस समजावी म्हणून यांतहि टेबल्स, चार्टस्, ग्राफ्स, इंडेक्स नंबर्स ( दर्शकांक ) वगैरे पोटभेद निर्माण झाले. यांतहि पुढें, अचूक किंवा शक्य तितक्या जवळचा अंदाज सांगण्यास दर्शकांकच ( इंडेक्स नंबर ) अधिक सोयीचा व परिणामी आहे, असें आढळून आल्यावरून, सर्वप्रकारच्या तुलना किंवा इतर गरजांसाठी यांचाच प्रकार सर्वत्र लोकप्रिय झाला आहे.

**उपयुक्तता**

२. ' दर्शकांक ' हे किंमतींतील चढउतार, चलनांची वाढती किंवा घटती खरेदीशक्ति, उत्पादनांतील फेरबदल, मागणी व पुरवठा यांचा अन्योन्य संबंध, राहणीचें मान, उत्पादन, व्यापार, उलाढाली व जीवनांतील हरऐक आधिभौतिक साधनसामुग्रीचें गमक शक्य तितक्या अचूक किंवा परिणामकारकरित्या दर्शवूं शकतात आणि या सर्व गोष्टींचें सम्यक् ज्ञान, हें कोणत्याहि भरीव व दीर्घकालीन योजनांचा आधारस्तंभ आहे.

**समाज आणि शास्त्रें**

३. कोणत्याहि शास्त्रांत झपाट्यानें प्रगति होत गेली कीं तें शास्त्र बहुजनसमाजास अगम्य होतें. इतकेंच नव्हे तर, सुशिक्षित व सुज्ञ म्हणविणाऱ्यांनाहि जगांतील अनेक बाबींविषयीं अज्ञानांतच राहावें लागतें. याच न्यायानें संख्याशास्त्र ( Statistics ) व त्यांतहि दर्शकांक ( Index Numbers ) म्हणजे काय किंवा त्याचे उपयोग कोणते हें अनेकांस कोडें आहे. तसेंच जी गोष्ट आपणांस समजत नाहीं किंवा ज्यांतील आपणांस गम्य नाहीं; ती दुसऱ्यांनीं केली असतां, अनेकांस विषाद वाटतो, त्यांस नापसंती दर्शावली जाते, विरोध होतो.

**दर्शकांक म्हणजे काय ?**

४. मनुष्य हा मोठा आशावादी प्राणी आहे. उद्यां काय ? हें जाणण्याची किंवा उद्यांसाठी तरतूद करण्याची त्याच्याइतकी-जबरदस्त इच्छा किंवा शक्ति इतर प्राण्यांत आढळत नाहीं. अनेक भोंदु ज्योतिष्यांचें रहस्य या मानवी आकांक्षेतच आहे. काल काय होतें, आज काय आहे यावरून तो नेहमीं उद्यां, परवां, तेरवां, पांच, दहा, पन्नास शंभर वर्षांपर्यंतचा अंदाज बांधण्यापर्यंत त्याची मजल जाते. दैनंदिन व्यवहारांतील अनेक गोष्टी घ्यावयाच्या, त्या तोलावयाच्या, मोजावयाच्या, त्यांचा एकमेकांशीं पडताळा घालावयाचा, मागच्यांची–आजच्याशीं, दुसऱ्याची–तिसऱ्यांशीं तुलना करावयाची हा मानवधर्म आहे. अशी ही सम्यक् तुलना हाच तर व्यापार, उद्योगधंदे, राजकारण किंवा दैनंदिन व्यवहार यांतील यशाचा पाया आहे आणि दर्शकांक ( Index numbers ) म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून अधिभौतिक साधनांची अशी तुलना करण्याचें किंवा मोजमाप घेण्याचें एक साधन आहे. ऐहिक वस्तूंच्या साधनसामुग्रींतून व कोलाहालांतून तुलनात्मक दृष्टीनें पाहण्याचें तें एक माध्यम आहे.

( अपूर्ण )

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार









# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद

कोहिनूर मिल्स } २२–२–४६ ते १६–३–४६
सेंट्रल बँक }
गोकाक मिल्स १–३–४६ } २१–३–४६
अपोलो मिल्स १–३–४६ ते २३–३–४६

व्याज-वजा

कोहिनूर—२८-३-४६ अपोलो—२९-३-४६
फिनले मिल्स रु. १५ दि. १४–३–४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार ४।३।४६ | मंगळवार ५।३।४६ | बुधवार ६।३।४६ | गुरुवार ७।३।४६ | शुक्रवार ८।३।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २९४२—८ | २९३०—० | २९२५—० | २९०७—८ | |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५४०—८ | ५३३—० | ५३१—८ | ५२९—० | |
| २२२२-८; १७६३-१२ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २४९२—८ | २४५२—८ | २४६७—८ | २४६५—० | |
| ७०२; ५६६ | १९—–० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ८३८—० | ८३१—० | ८१२—० | ८२७—० | |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७२६—० | ७०८—० | ७१५—० | ७२१—० | |
| ४४३–८; ३६० | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ५०१—० | ४८४—० | ४९०—० | ४८९—० | |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३९१—० | ३९९—० | ३९६—० | ३९२—० | |
| ३३५; २८३-८ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३६७—० | ३६०—० | ३६०—० | ३५६—० | |
| ३३७; २४३ | ४–१–० † | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३८८—० | ३८६—० | ३९४—८ | ३९३—८ | बाजार |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—८ | ५—८ | ५–८–६ | ५–८–६ | |
| १७ १०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २०–१० | १९–१४ | २०—३ | २०–१२ | बंद |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ४—२ | ३–१५–६ | ३–१५–६ | ३–१५–० | |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८१५—० | ८१५—० | ८१३–१२ | ७९८-१२ | |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २६०—० | २५७–१२ | २६१—० | २६४—० | |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५७—० | २५५—० | २५४—८ | २५४—८ | |
| ५९२–८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६३५—० | ६३५—० | ६३५—० | ६३१—८ | |
| ३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४६—२ | ४६–१४ | ४६—६ | ४६—४ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—५ | १०३–४–० | १०२-१४-६ | १०२–१४ | |

सोमवार दि. ४–२–४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे. सोमवार, दि. ११ मार्चला निवडणुकीनिमित्त बाजार बंद होता.

गुरुवार दि. ७–३–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१–१० | बरोडा | १७१—८ | आंध्रा व्हॅली | १८९०–० | अलकॉक | ४८८–१२ |
| १९५१–५४ | १०२—४ | सेंट्रल | १२१—० | बॉम्बे ट्रॅम | १६१–० | बॉम्बे स्टीम | ६७५—० |
| १९५७ | १०१–१५ | इंडिया | २४६—० | टाटा हायड्रो | २२४–० | न्यू इंडिया | १००—८ |
| १९५९–६१ | १०१–१३–६ | इंपी० | २४५—० | टाटा पॉवर | १९८५–० | शिवराजपुर | ६२—० |
| १९६३–६५ | १००–१५ | | ६१७—८ | | | टाटा केमिकल | २३—० |
| १९६६–६८ | १००–१४ | रिझर्व्ह | १५९—८ | | | टाटा ऑईल | ९९—८ |
| १९७०–७५ | १००—० | युनियन | १२—४ | | | | |

पुढील आठवड्यांत सोमवार, दि. १८।३।४६ आणि २१–३–४६ ला सार्वजनिक सुट्यानिमित्त बाजार बंद आहे.

### अमेरिकेचे महापुरुष

" अमेरिकेच्या सबंद इतिहासांत, त्या देशांत राहिलेल्या लोकांमध्यें सर्वांत मोठे कोण होते ? " असा प्रश्न विचारून नॅशनल ओपिनिअन रिसर्च सेंटरनें अमेरिकेंत मतें गोळा केलीं. त्यांत रूझवेल्टचा पहिला, ॲब्राहम लिंकनचा दुसरा व जॉर्ज वॉशिंग्टनचा तिसरा अनुक्रम आला. एडिसन, वुड्रो विल्सन, जनरल ऐसेन हॉवर, ह्यांसहि कांहीं मतें पडलीं. रूझवेल्ट पुरुषांपेक्षां स्त्रियांत व वृद्धांपेक्षा तरुणांत अधिक लोकप्रिय असल्याचें आढळलें.

### हिंदुस्थानची राष्ट्रसंघाची वर्गणी

हिंदुस्थान अद्याप जुन्या राष्ट्रसंघाचा सभासद आहे. १९४६ सालाकरितां तो राष्ट्रसंघास १४,२०,००० रुपये वर्गणी देणार आहे.

### औद्योगिक अल्कोहोलचें उत्पादन

औद्योगिक अल्कोहोल तयार करणारे हिंदुस्थानांत ३५ कारखाने आहेत. त्यांचें उत्पादन ८० लक्ष गॅलन्सचें आहे.

### परतलेल्या सैनिकांचें शिक्षण

युद्धांतून परत आलेल्या अमेरिकन सैनिकांपैकीं ९,००० सैनिक फोर्ड कंपनींत काम शिकत आहेत. त्यांना कंपनी पगार देते व अमेरिकन सरकारकडूनहि त्यांस तनखा मिळतो. दोन वर्षांचा शिक्षणक्रम पुरा झाल्यावर त्यांस मोटारींच्या धंद्यांत चांगले पैसे मिळवितां येतील, अशीच योजना आहे.

### पाइप्सचा तुटवडा

इंग्लंडमधील तंबाखू ओढण्याच्या पाइप्सचा मोठा तुटवडा पडला आहे. हे पाइप करण्यासाठीं लागणारें लाकूड उत्तर आफ्रिका, कोर्सिका, अल्बेनिया, इटली, ग्रीस, दक्षिण फ्रान्स, इत्यादि ठिकाणांहून येत असे. तें अद्याप पुनः येऊं लागलेलें नाहीं. कामगारांचाहि तुटवडा आहेच.

### कोहिनूर मिल्स कं लि.

वरील कंपनीस १९४५ सालीं ९७ लक्ष रुपये नफा झाला. १९४४ सालीं १ कोटी, ३८ लक्ष रुपये नफा झाला होता.

## सन १९४५ मधील प्रगति

नवें काम ७,००,००० रु.

चालू काम १०,००,००० रु.

१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न सुमारें १,००,००० रु.

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

### दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

## १९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर

१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

### दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए. — अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

—दररोज वापरण्यासाठीं लागणारें—

### लोणी आणि चक्का

खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील —प्रमुख ठिकाण—

बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.

भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें —आदर्श ठिकाण—

### चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स् लिमिटेड

मॅनेजिंग एजंटसः—चितळे ब्रदर्स

रजिस्टर्ड ऑफिस—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

### ओलक शिवण्याचीं यंत्रें

☞ रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात. ☜

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट, ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ, लक्ष्मीरोड, पुणें नं. २

### बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

——— : स्टॉकिस्ट पाहिजेत : ———


### पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी, पो० कराड, जि. सातारा.

### पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७३८२

लहान मुलांकरितां — **आर्को** — गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :

मंगळवार पेठ, कोल्हापूर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ६१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.